**नि.फौ.प्र.क्रं. ९६२/२०१७**
**शासन—वि— जय कुळकर्णी**
**नि.क्रं. २५**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ६ याची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

माझे नांव :— प्रशांत ईश्वरलाल अहिरे
वय :— ४९ वर्षे, धंदा : —पोलीस निरीक्षक,
राहणार :— मालेगाव, जि. नाशिक

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील**
**श्री. संजय राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु**

सन २०१६ ते २०१७ मी निगडी पोलीस स्टेशन येथे सहा. पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. वरिष्ठाचे आदेशाप्रमामणे गु.र.नं. २०१/२०१७ ची केस डायरी मला तपासकामी सोपविण्यात आली होती. केस डायरी भेटल्यानंतर मी पंचासमक्ष दि. १५.०४.२०१७ रोजी प्लॉट नं. २७४ सर्व्हे नं. २८ निगडी प्राधिकरण येथे घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरे व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे घटनास्थळ पंचनाम्याला **निशाणी क्रं. २६** देण्यात येतो. त्यानंतर मी साक्षीदारांचे बयाण त्यांचे म्हणणेप्रमाणे नोंदवुन घेतले. दि. २६.०४.२०१७ रोजी वैदयकिय अधिकारी यांना वैदयकिय प्रमाणपत्र भेटण्याकरिता मी पत्र पाठविले होते. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरे व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे पत्राला **निशाणी क्रं. २७** देण्यात येतो. सदरचे पत्राअनुषंगाने जख्मीचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तांतरित केले. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली. आरोपी लोकांविरोधात सबळ पुरावा असल्यामुळे त्यांचे विरोधात न्यायालयात अंतिम अहवाल दाखल केला.

**२.** मी आरोपी लोकांना ओळखु शकतो. आज आरोपी क्रं. २ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे आरोपींचे विधीज्ञ श्री. पवार यांचेतर्फे शपथेवर सुरु**

**३.** हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळावर न जाता आमचे कार्यालयात बसुन घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही

की तपासात आरोपी व फिर्यादीमध्ये मिळकतीचा वाद असल्याबद्दल सिध्द झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी फिर्यादीची सांगणेप्रमाणे आरोपी लोकांविरोधात खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.09.19 17:48:32 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.09.19 17:48:35 +0530

**(अल अमुदी ए. के.)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि. १९.०९.२०२५

**(अल अमुदी ए. के.)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती किर्ती उदय पवार

न्यायालयाचे नांव : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे.

न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक :१९/०९/२०२५

न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक :१९/०९/२०२५

पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक : १९/०९/२०२५

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)